F.O.97 (35)

N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**

प्रथम खबर अहवाल

(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District (जिल्हा):** बीड  **P.S.(ठाणे):** माजलगांव शहर  **Year (वर्ष):** 2020

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0063  **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 28/02/2020 22:37 बजे

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** शुक्रवार  **Date From (दिनांक पासून):** 28/02/2020

**Time Period (कालावधी):** पहर 4  **Date To ( दिनांक पर्यंत):** 28/02/2020

**Time From (वेळेपासून):** 11:15 बजे

**Time To (वेळेपर्यंत):** 11:40 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 28/02/2020  **Time (वेळ):** 22:21 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ**

**Entry No. (नोंद क्र.):** 043  **Date & Time (दिनांक आणि वेळ):** 28/02/2020 22:21 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):** पूर्व, 1.5 किमी

**Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** 1 केंद्रीय प्राशामाजलगाव 2

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** रणजीत गोपीनाथ राठोड

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1985  (d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**  **Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **Id details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License,PAN)**
ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No.(अ. | Id Type (ओळखपत्राचा प्रकार) | Id Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

(h) **Address (पत्ता):**

| S.No.(अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | सह्याद्री गार्डन रो हाऊस नविन ,भाटवडगाव तामाजलगाव,माजलगांव शहर,बीड,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | सह्याद्री गार्डन रो हाऊस नविन ,भाटवडगाव तामाजलगाव,माजलगांव शहर,बीड,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):** **Mobile (मोबाइल नं.): 91-9657732303**

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | शामसुंदर मारुती दासरे | | | 1. गजानन नगर, शेजुळ मिल समोर, माज, माजलगाव,माजलगांव शहर,बीड,महाराष्ट्र, भारत |
| 2 | काशिनाथ विठ्ठलराव बोगुलवार | | | 1. बँक कलनी, मजरंथ रोड, माजलगाव, माजलगांव शहर,बीड,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. मध्ये)) |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 500 रु दराच्या तीन नोटा एकुण 1500 रु | 1,500.00 |

10 **Total value of property (In Rs/-)-(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):** 1,500.00

11 **Inquest Report / U.D. case No., if any (इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12 **First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

फिर्याद दिनांक :- 28/02/2020.ए.सी.बी कार्यालय,बीड.मी रणजीत गोपीनाथ राठोड, वय 35 वर्षे, धंदा-नौकरी सह शिक्षक, जि.प.प्रा.शा. वडार नगर, माजलगाव रा. सह्याद्री गार्डन रो हाऊस नविन वसाहत, भाटवडगाव ता.माजलगाव जि.बीड. मो.नं.9657732303.मी दि. 25/02/2020 रोजी अॅसीबी कार्यालय, बीड येथे श्री.हनपुडे पाटील, पोलीस उप अधीक्षक, अॅसीबी, बीड यांना फोनवर माझी दोन लोकसेवकाविरुध्द तक्रार असल्याचे सांगुन माझी तक्रारीप्रमाणे माजलगाव येथुन कारवाई करणे बाबत विनंती केली. त्यावर दिनांक 26/02/2020 रोजी आपण पोलीस निरीक्षक श्री. पाडवी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, बीड सोबत सापळा पथक व पंच असे सुरक्षित ठिकाणी माजलगाव येथे येऊन तक्रार दिली की, माजलगाव नं.2 या केंद्राचे मुख्याध्यापक श्री. दासरे यांनी माझ्याकडे पगार बील करण्यासाठी तसेच माझे आय.टी. रिटर्न करुन देण्यासाठी 2,000/-रु.ची मागणी करत आहेत. तसेच मी डिसेंबर 2018 मध्ये अर्जित रजा घेतली होती, परंतु सदर अर्जीत रजेचा आदेश प्राप्त झाला नसल्याचे श्री. दासरे यांनी सांगितले. त्यामुळे माझा जानेवारी 2020 चा पगार कमी करुन शाळेचा खात्यावर वर्ग करण्यात आला. सदरची अर्जीत रजा मंजुर करण्यासाठी लिपीक श्री. बोगुलवार यांना भेटलो असता त्यांनी माझी रजा मंजुर करण्यासाठी माझ्याकडे 500/- रु ची मागणी केली. तरी केंद्रीय मुख्याध्यापक श्री. दासरे व गटशिक्षणाधिकारी कार्यालय, माजलगाव येथील लिपीक श्री. बोगुलवार यांचेवर कायदेशीर कारवाई करावी, वगैरे मजकुराची तक्रार दिली होती.मी दिलेल्या तक्रारीवरुन दि.26/02/2020 रोजी पोलीस निरीक्षक श्री. पाडवी यांनी मुख्याध्यापक श्री. दासरे हे माझ्याकडे लाचेची मागणी करतात किंवा कसे याबाबत केंद्रीय जि.प. प्रा.शा. माजलगाव नं.2 येथे तसेच लिपीक श्री. बोगुलवार हे लाचेची मागणी करतात किंवा कसे याबाबत गटशिक्षणाधिकारी कार्यालय, माजलगाव येथे मला व पंच क्र.1 जोगंदड यांना पाठवुन लाचमागणी पडताळणी करण्याचा निर्णय घेतला. त्यानंतर सदर लाचमागणी पडताळणीचे अनुषंगाने मला व पंचाना योग्य त्या सुचना दिल्या. त्यानंतर मला व पंच क्र.1 यांना दासरे यांचेकडे पाठवुन लाचमागणी पडताळणी करण्यात आली. लाचमागणी पडताळणीत लोकसेवक दासरे यांनी माझ्याकडे आय.टी. रिटर्न करुन देण्यासाठी 400/- रु. व पगार बिलाचे प्रति महिना 50/-रु. प्रमाणे असे वर्षाचे एकुण 600/-रु. असे एकुण 1,000/- रु. लाचेची मागणी करुन लाच रक्कम स्वीकारण्याचे मान्य करुन माझ्या रजेच्या प्रस्तावावर सही करुन मला लिपीक बोगुलवार यांना भेटण्यास सांगितले. त्यावर मी गटशिक्षणाधिकारी कार्यालय, माजलगाव येथे जाऊन लिपीक बोगुलवार यांना भेटुन माझी रजा मंजुर करण्यासाठी माझ्याकडे 500/-रु. लाचेची मागणी करुन लाच रक्कम स्विकारण्याचे मान्य केले. तसा दि.26/02/2020

रोजीचा लाचमागणी पडताळणीचा सविस्तर पंचनामा करण्यात आलेला आहे. त्यावरुन आज दि.28/02/2020 रोजी माजलगाव येथे सुरक्षितस्थळी दोन शासकीय पंचांसमक्ष श्री. पाडवी यांनी मला व दोन्ही पंचांना अँथ्रासीन पावडर व अल्ट्राव्हायलेट लम्प यांचा उपयोग व गुणधर्म सांगुन त्याचे प्रात्यक्षीक दाखवुन मी हजर केलेल्या 1,500/-रु.लाच रकमेस अँथ्रासीन पावडर लावली व सदरची लाच रक्कम ही माझे पँटचे समोरील उजवे खिशात ठेवली. मला लाच स्वीकृतीनंतर करावयाचा ईशारा नेमुन दिला. वगैरे बाबींचा सापळापुर्व कारवाईचा पंचनामा करण्यात आला.सापळापुर्व कारवाईचा पंचनामा पुर्ण झाल्यानंतर मला व दोन्ही पंचांना व सापळा पथकास सापळा कारवाईचे अनुषंगाने सुचना दिल्या. त्यानंतर व्हईस रेकर्डर चालु करुन माझ्याकडे देऊन मला व पंच क्र.1 यांना मुख्याध्यापक दासरे यांना लाच रक्कम देण्यासाठी केंद्रीय प्रा.शा. माजलगाव नं.2 तसेच लिपीक बोगुलवार यांना लाच रक्कम देण्यासाठी गटशिक्षणाधिकारी कार्यालय, माजलगाव येथे रवाना करण्यात आले. आमचे पाठोपाठ सापळा पथक व पंच क्र.2 हे येत होते. मी व पंच क्र.1 असे दोघेही केंद्रीय शाळेत गेलोत. तेथे मुख्याध्यापक दासरे हे हजर होते. तेथे माझी व दासरे यांची माझ्या कामाविषयी चर्चा झाली. चर्चेदरम्यान मुख्याध्यापक दासरे यांनी माझ्याकडे पैशाबाबत विचारणा केली त्यावेळी मी माझे उजवे हाताने पँटचे समोरील उजवे खिशातुन लाच रक्कम 1,000/- रुपये दासरे यांचे समोर धरले असता त्यांनी सदरची लाच रक्कम टेबलवर ठेवण्यास सांगितली. त्यावर मी सदरची रक्कम टेबलवर ठेवुन दिली. त्यानंतर मी लिपीक बोगुलवार यांचेकडे गेलो. बोगुलवार यांचेशी माझी माझे कामाविषयी चर्चा झाली त्यादरम्यान बोगुलवार यांनी माझ्याकडे पैशाची मागणी केली असता मी माझे उजवे हाताने पँटचे समोरील उजवे खिशातुन लाच रक्कम 500/- रुपये बोगुलवार यांचे समोर धरले असता त्यांनी सदरची लाच रक्कम ही उजवे हाताने स्वीकारुन त्यांनी परिधान केलेल्या पँटच्या समोरच्या डाव्या बाजुच्या खिशात ठेवली. त्यानंतर मी आपण मला लाच स्विकारल्या बाबतचा नेमुन दिलेला पुर्व नियोजीत इशारा केला. इशारा प्राप्त होताच श्री. पाडवी व पो.नि. परदेशी हे पंच क्र.2 व त्यांचे स्टाफसह आमचेजवळ आले. माझ्याकडील व्हईस रेकर्डर बंद केला. तेव्हा श्री.पाडवी यांनी बोगुलवार यांना त्यांची स्वत:ची, दोन्ही पंचांची व सापळा पथकाची ओळख करुन दिली. त्यानंतर श्री. पाडवी यांनी पंच क्र.1 यांना पंच क्र.2 यांचेसमक्ष विचारणा केली की मला कोणी लाचेची मागणी केली व माझेकडुन कोणी लाच रक्कम स्वीकारली. तेव्हा पंच क्र.1 यांनी सांगितले की, तक्रारदार यांना लिपीक बोगुलवार यांनी पैशाची मागणी करुन स्वत: 500/-रु. लाच रक्कम स्वीकारली आहे, असा खुलासा पंच क्र.1 यांनी केला. त्यानंतर श्री.पाडवी यांनी बोगुलवार यांना लाच रक्कमबाबत विचारले असता बोगुलवार यांनी सदरची लाच रक्कम ही त्यांचे पँटचे समोरील डावे बाजुच्या खिशात ठेवल्याचे सं◌ागितले. त्यानंतर श्री.पाडवी यांनी बोगुलवार यांना त्यांचे पुर्ण नाव पत्ता विचारता त्यांनी काशिनाथ विठ्ठलराव बोगुलवार, वय 49 वर्ष, कनिष्ठ लिपीक, गटशिक्षणाधिकारी कार्यालय, माजलगाव जि.बीड वर्ग-3 रा. बँक कलनी, मजरथ रोड, माजलगाव असे सांगितले. बोगुलवार कडील लाच रक्कम 500/- रुपये पंचासमक्ष ताब्यात घेतले. त्यानंतर आपण घटनास्थळावर प्राथमीक कारवाई करुन बोगुलवार यांना घेऊन केंद्रीय प्रा.शाळा माजलगाव नं. 2 येथे घेऊन आलात. तेथे आपण दासरे यांना ताब्यात घेउन आपली स्वत:ची, दोन्ही पंचांची व सापळा पथकाची ओळख करुन दिली. त्यानंतर श्री.पाडवी यांनी पंच क्र.1 यांना पंच क्र. 2 यांचेसमक्ष विचारणा केली की मला कोणी लाचेची मागणी केली व माझेकडुन कोणी लाच रक्कम स्वीकारली. तेव्हा पंच क्र.1 यांनी सांगितले की, तक्रारदार यांना केंद्रीय मुख्याध्यापक दासरे यांनी पैशाची मागणी करुन लाच रक्कम 1,000/-रु. टेबलवर ठेवण्यास सांगितले, असा खुलासा पंच क्र.1 यांनी केला. त्यानंतर श्री.पाडवी यांनी दासरे यांना लाच रक्कमबाबत विचारले असता दासरे यांनी सदरची लाच रक्कम ही त्यांचे पँटचे समोरील उजवे बाजुच्या खिशात ठेवल्याचे सं◌ागितले. त्यानंतर श्री.पाडवी यांनी दासरे यांना त्यांचे पुर्ण नाव पत्ता विचारता त्यांनी शामसुंदर मारुती दासरे, वय 47 वर्ष, केंद्रीय मुख्याध्यापक, जि.प. के. प्रा.शा. माजलगाव नं.2 रा. गजानन नगर, शेजुळ मिल समोर, माजलगाव असे सांगितले. दासरे यांचेकडील लाच रक्कम 1,000/- रुपये पंचासमक्ष ताब्यात घेतले. त्यानंतर आपण केंद्रीय मुख्याध्यापक दासरे व लिपीक बोगुलवार यांना घेऊन लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालय, बीड येथे आलात.तरी केंद्रीय मुख्याध्यापक दासरे व लिपीक बोगुलवार यांनी माझ्याकडे आय.टी. रिटर्न, पगार बिल काढण्यासाठी तसेच अर्जीत रजा मंजुर करण्यासाठी दि.26/02/2020 रोजी 1,500/-रु.लाचेची मागणी करुन लाच रक्कम स्विकारण्याचे मान्य करुन आज दि.28/02/2020 रोजी स्वत: शासकीय पंचांसमक्ष स्वीकारली असता लोकसेवक दासरे व बोगुलवार यांना लाचेच्या रकमेसह 11.40 वा. रंगेहात पकडले आहे. लाच रक्कम 1,500/-रु. पंचांसमक्ष जप्त करण्यात आलेली आहे. तरी माझी शामसुंदर मारुती दासरे, केंद्रीय मुख्याध्यापक, जि.प. के. प्रा.शा. माजलगाव नं.2 व काशिनाथ विठ्ठलराव बोगुलवार, कनिष्ठ लिपीक, गटशिक्षणाधिकारी कार्यालय, माजलगाव जि.बीड यांचेविरुध्द माझी कायदेशीर फिर्याद आहे.

**13. Action** **Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at**
(केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि ~~तपासाचे काम हाती घेतले~~): SURESH SAVLERAM BUDHVANT(I (Inspector)) / PI **or** (~~किंवा~~)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव): RAJKUMAR SAYSING PADAVI (Inspector)
**Rank** (पद): P.I. (ACB)
**No.**(क्र.): **to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14. **Signature/Thumb impression of the complainant / informant.**(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court** (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

विजय कुमार थोटे
पोलीस उप निरीक्षक
पो.स्टे.माजलगाव (शहर)

**Signature of Officer in charge, Police Station** (ठाणे प्रभारी अधिका-याची

**Name** (नाव): SURESH SAVLERAM BUDHVAN
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.): PI